*ड्राफ्ट नोट - ०१ जुलै २०२२*

*NCERT पाठ्यपुस्तकात केलेल्या प्रतिगामी व असंवैधानिक बदलास AIPSN चा विरोध*

*नोट*

ऑल इंडिया पीपल्स सायन्स नेटवर्क (AIPSN) चिंतित आहे की, NCERT मधील शालेय पाठ्यपुस्तकांच्या संदर्भात 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण- 2020' ची अंमलबजावणी आधीपासूनच व्यापकपणे शैक्षणिक, राजकीय आणि सामाजिक परिणामांसह सुरू आहे. कोणताही शैक्षणिक विचार किंवा शैक्षणिक तर्क न वापरता बदल करण्यात आले आहेत. शालेय स्तरावर वापरल्या जाणाऱ्या सामाजिक शास्त्रांच्या पाठ्यपुस्तकांतील मजकूर हटवण्याआधी आणि पुनरावृत्ती करण्यापूर्वी एससीईआरटी आणि राज्य सरकारांचे शिक्षण विभाग, शालेय शिक्षक आणि व्यापक शैक्षणिक समुदायाशी सल्लामसलत करण्यात आलेली नाही. सर्व बदल घाईघाईने करण्यात आले आहेत. शैक्षणिक अभ्यासक, शिक्षक आणि पीपल्स सायन्स मूव्हमेंट्सने देखील याआधी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) 2020 बद्दल त्यांच्या शंका केंद्र सरकार आणि राज्य सरकारांना स्पष्ट केल्या आहेत कारण त्यांच्याकडे जबाबदारी आणि धोरण बनवण्याचा विषय  आहे.
या संदर्भात नुकत्याच केलेल्या इंडियन एक्स्प्रेसच्या तपासात असे दिसून आले आहे की, कोट्यवधी विद्यार्थ्यांचा समावेश असलेल्या शाळांमध्ये वापरल्या जाणाऱ्या सामाजिक शास्त्रांच्या पाठ्यपुस्तकांमध्ये शक्य तितक्या अपारदर्शक पद्धतीने केलेले व्यापक बदल करण्यात NCERT सहभागी आहे. NCERT ही भारत सरकारची एक विशेष सर्वोच्च संस्था असल्याने आवश्यक प्रक्रियेत राज्य स्तरावर काम करणारे अधिकारी आणि शिक्षणतज्ञ यांचा समावेश असावा. NCERT ची पोहोच खूप विस्तृत आहे आणि कोणत्याही विशिष्ट राज्यापुरती मर्यादित नाही. सामाजिक शास्त्राच्या क्षेत्रात प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणात वापरण्यात येणारी शालेय शिक्षणाची पाठ्यपुस्तके संपूर्णपणे समाजावर परिणाम करू शकतात. म्हणून ही प्रक्रिया शैक्षणिक गरजा आणि भारतीय राज्यघटनेत समाविष्ट केलेल्या शालेय शिक्षणाशी संबंधित तरतुदींशी सुसंगतपणे व लोकशाही पद्धतीने हाती घेतली गेली पाहिजे. राज्य-नागरिक संबंध, लोकशाहीची दृष्टी, धर्मनिरपेक्षता आणि भारतीय राज्यघटनेत अंतर्भूत केलेल्या शिक्षणाची घटनात्मक दृष्टी याविषयीच्या काही महत्त्वाच्या मुद्द्यांवर ही अभ्यासक्रमात सुधारणा केल्या जात आहेत. तपासात नोंदवल्याप्रमाणे अपारदर्शक रीतीने ही सुधारणा करण्यात आली आहे. भाग तोडणे, पुनरावृत्ती करणे आणि  मूल्ये हटवणे हे सामाजिक शास्त्रांच्या पुस्तकांचे पुनर्लेखन करण्यासारखेच आहे. सामाजिक शास्त्राच्या पाठ्यपुस्तकांमध्ये 2002 मध्ये गुजरातमध्ये मुस्लिमांविरुद्ध झालेल्या हिंसाचाराशी संबंधित सामग्री आणि 1975-77 मधील आणीबाणीवरील चर्चेचा समावेश आहे. शिक्षणाची सर्वोच्च संस्था इतिहासाच्या पाठ्यपुस्तकांमध्ये राजकीय आणि वैचारिकदृष्ट्या प्रेरित बदल सुचवत आहे.
उदाहरणार्थ, दिल्ली सल्तनत आणि मुघल साम्राज्याशी संबंधित सामग्री हटवणे. जातिव्यवस्थेतील असमानता आणि नर्मदा बचाव आंदोलनासारख्या सामाजिक चळवळींच्या विषयी ज्या सुधारणा केल्या आहेत त्यांचा विद्यार्थी कसे शिकतात यावर प्रभाव राहणार आहे.
केलेल्या बदलांवरून शालेय पाठ्यपुस्तकांचे पुनर्लेखन होत असल्याचे स्पष्ट झाले आहे. प्रतिगामी स्वभावाच्या राजकारण आणि विचारसरणीच्या जोरावर पुनर्लेखन झाले आहे. अत्यंत शंकास्पद आणि दडपशाही प्रक्रियेद्वारे समाजातील तार्किक विचारसरणी पूर्णपणे काढून टाकण्याचा हेतू आहे. शालेय शिक्षणाच्या पाठ्यपुस्तकांमध्ये शिफारस केलेल्या बदलांमध्ये हेच दिसून येते. अन्यायाची व्यवस्था आहे या नावाखाली जातीव्यवस्थेबद्दलचे विषय हटवण्यामुळे विद्यार्थ्यांना जात, समुदाय, वर्ग आणि राजकीय-नोकरशाही यंत्रणा यासारख्या संस्थांचे वास्तव चित्रण समजण्यापासून आणि भारतातील सामाजिक चळवळींच्या उदयाचे वास्तव समजून घेण्यापासून विद्यार्थ्यांना प्रतिबंधित केले जाईल. सामाजिक विज्ञान-इतिहासावरील पूर्वीची पुस्तके संपादित करणाऱ्या व्यापक शैक्षणिक समुदायाला आणि सामाजिक शास्त्रज्ञांना सामील केलेले नाही. उलट सामाजिक, विज्ञान व शैक्षणिक योगदानासाठी प्रसिद्ध नसलेल्या व्यक्तींनी ज्ञानाच्या राजकीय आणि सामाजिक क्षेत्रांमध्ये बदल केले आहेत. NCERT मध्ये अवलंबलेल्या प्रक्रियेला शिक्षण मंत्रालयाचा पूर्ण पाठिंबा आहे. शालेय स्तरावरील अभ्यास बदलण्यामागे हिंदुत्वाचा अजेंडा प्रतिबिंबित होतो. हा प्रकार नामंजूर करणे गरजेचे आहे.
2020 च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या निर्मितीच्या टप्प्यावरच विज्ञान चळवळींनी  हेरले होते की, शिक्षणात होणारे बदल प्रतिगामी असतील. परंतु आताच्या टप्प्यावर या बदलांची दिशा आणखीनच धोकादायक प्रवृत्ती दर्शवत आहे. सत्ताधारी पक्षाच्या नेतृत्वाखालील राज्य सरकारे हीच प्रक्रिया विविध राज्यांमध्ये सक्रियपणे

राबवत आहेत. कर्नाटक सरकार अशाच प्रकारचे बदल करण्यासाठी कटिबद्ध झाले आहे. राज्य पातळीवर सक्रिय असलेल्या विरोधी पक्षांच्या नेत्यांच्या आणि सामाजिक चळवळींच्या विरोधाला न जुमानता सरकार या बदलांना घेऊन पुढे जात आहे. सत्ताधारी पक्षाला घटनात्मक बंधने पाळण्यात स्वारस्य नाही हाच अर्थ निघतो. राजकीय-नोकरशाही यंत्रणा NCERT चा वापर करून असा बदल घडवून आणत आहे ज्यामुळे लोकशाही, शिक्षण आणि सामाजिक दिशांवर विपरित परिणाम होईल.

AIPSN केंद्र सरकारला पाठ्यपुस्तकांमध्ये अशैक्षणिक हेतूने आणि जातीय उद्देशाने चालवलेली तर्कहीन छेडछाड थांबवण्याची विनंती करत आहे. सध्याच्या पाठ्यपुस्तकात कोणतेही बदल करण्याआधी आपल्या संविधान आणि घटनात्मक मूल्यांबद्दल दृढ विश्वास असलेल्या आणि अध्यापनशास्त्राविषयी सखोल समज असलेल्या तज्ञ लोकांना घेऊन राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा विकसित करावा अशी मागणी करत आहोत. पाठ्यपुस्तकातील कोणतेही बदल हे शैक्षणिक तर्कशास्त्र आणि अध्यापनशास्त्रीय पद्धतीने केले जावेत.

या विषयावर जनतेला एकत्र येण्याचे आम्ही आवाहन करतो आहोत आणि NCERT ने हाती घेतलेल्या पाठ्यपुस्तकांमध्ये घाईघाईने, प्रतिगामी, असंवैधानिक आणि गैर-शैक्षणिक बदलांचा प्रतिकार करण्याचे आवाहन करत आहोत.

*संभाव्य कृती*

1. या विषयावर राष्ट्रीय स्तरावरील ऑनलाइन बैठक आयोजित करा.
2. सर्व राज्यांमध्ये प्रेस नोट जारी करणे.
3. केंद्र सरकारच्या प्रतिगामी उपायांवर प्रकाश टाकणारी पत्रकार परिषद घ्यावी
4. NEP विषयावर राज्यांच्या समविचारी संघटनांचा कॉमन प्लॅटफॉर्म तयार करण्याच्या शक्यतांचा शोध घ्या
5. NEP हा प्लॅटफॉर्मचा प्रमुख अजेंडा हा लोकप्रिय अजेंडा बनवण्यासाठी चर्चासत्र आणि सोशल मीडिया मोहिम हे उपक्रम राबवा.
6. लोकप्रतिनिधींना पत्र लिहा.
7. लोकांचे लक्ष वेधून घेणाऱ्या इतर कोणत्याही सांस्कृतिक व संयुक्तिक कृती करा. भिंती रंगवणे, पोस्टर बनविणे इ.
8. काही राज्यांमध्ये NEP अंमलबजावणी सुरू आहे. त्यावर प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष मार्गावर लक्ष ठेवण्यासाठी प्रत्येक राज्यात एक टीम तयार करावी लागेल.
9. छोट्या छोट्या गटांमध्ये विरोध करा